# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# रानभाजी महोत्सव तरुण पिढीसाठी आरोग्य मंत्र : विक्रमसिंह पाटणकर

पाटण : पुढारी वृत्तसेवा

शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था यांनी पुढाकार घेऊन रानभाजी महोत्सवाचे आयोजन करावे आणि पुढच्या पिढीसाठी हा नैसर्गिक वारसा जपावा, असे प्रतिपादन माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी केले.

बी. डी. कॉलेज पाटण वनस्पतीशास्त्र विभाग व रोटरी क्लब पाटण यांचे संयुक्त विद्यमाने रानभाजी व तृणधान्य महोत्सवा ते बोलत होते



पाटण : बोलताना विक्रमसिंह पाटणकर व्यासपीठावर संजीव चव्हाण, डॉ.शिरीष पवार, प्रा. डॉ.बी.व्ही.जाधव, किशोर तुळसनकर व इतर.

यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ.शिरीष पवार, प्रा. डॉ. बी. व्ही. जाधव, किशोर तुळसनकर, प्रा.डॉ. हेमलता काटे, प्राचार्य चेतन सावंत, प्रा. एस.ए.गायकवाड याची प्रमुख उपस्थिती होती.

विक्रमसिंहजी पाटणकर म्हणाले, आपल्याकडे सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात उगवणाऱ्या अनेक औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या आहेत. त्या आपल्या आरोग्यासाठी उपयोगी आहेत.ज्यांना याची माहिती आहे त्यांनी हा वसा पुढच्या पिढीला दिला पाहिजे. महोत्सवात ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये भारगा, टाकळा, वाईवरण, कोकणतोंडा, शेंडवळ, आळंबी, भोकर, उंबर, मुरड, अशा वेगवेगळ्या भाज्या वापरून विद्यार्थ्यांनी अतिशय रुचकर भाज्या बनविल्या होत्या. परीक्षकांनी स्पर्धेची पाहणी करून स्पर्धकांना रोख पारितोषिक देण्यात आली.

रानभाजी महोत्सव स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून, प्रा. एस.ए. गायकवाड, प्रा.अनिल पाटील,प्रा. प्रवीण गायकवाड, प्रा.डॉ. रचना थरवल यांनी काम पहिले.प्रास्ताविक प्रा. बी.व्ही.जाधव यांनी केले. आभार प्रा.डॉ.मंजुषा शिंदे यांनी मानले.